आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
३० ऑक्टोबर २०२५ - गुरूवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज गुजरातमधे १ हजार १४० कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी

- देशाचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त आयोजित राष्ट्रीय एकता दिनाचा सोहळा देशभरात साजरा होणार/ केवडिया इथल्या संचलनात महाराष्ट्राच्या चित्ररथाचा सहभाग

- भारताचे पुढचे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती सूर्य कांत यांची नियुक्ती

- जहाज बांधणी आणि नौवहन क्षेत्रात भारतानं पुन्हा एकदा वर्चस्व प्रस्थापित केलं असल्याचं केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्र्यांचं प्रतिपादन

**आणि**

- महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत नवी मुंबईत सुरु असलेल्या उपांत्य सामन्यात ऑस्ट्रेलियाचं भारतापुढं विजयासाठी ३३९ धावांचं आव्हान

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आजपासून दोन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर आहेत. त्यांनी आज केवडिया इथं एकता नगरमध्ये २५ ई-बसना हिरवा झेंडा दाखवला. तसंच एक हजार १४० कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या पायाभूत सुविधा आणि विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी केली. पर्यावरणपूरक पर्यटन, आदिवासी भागांचा विकास, आधुनिक पायाभूत सुविधा हे या प्रकल्पाचं उद्दिष्ट आहे.

प्रधानमंत्री मोदी उद्या सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त आयोजित राष्ट्रीय एकता दिवस समारोहात सहभागी होतील तसंच स्टॅच्यू ऑफ युनिटीला पुष्पांजली अर्पण करतील. ते बिरसा मुंडा आदिवासी विद्यापीठाचं आणि गुरुदेश्वर इथं हॉस्पिटॅलिटी डिस्ट्रिक्टच्या पहिल्या टप्प्याचं उद्घाटन करणार आहेत.

**<><><><>**

देशाचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांची दीडशेवी जयंती उद्या आहे. दरवर्षी हा दिवस राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा केला जातो. यंदा शतकोत्तर सुवर्णजयंतीचं औचित्य साधून देशभरात विविध कार्यक्रम होणार आहेत. गुजरातमधे केवडिया इथं स्टॅच्यू ऑफ युनिटी या सरदार पटेल यांच्या स्मारकापाशी प्रजासत्ताक दिन संचलनाच्या धर्तीवर एकता संचलनाचं आयोजन केलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते त्याचं उद्घाटन होणार आहे. या संचलनात विविध राज्यांची पोलिस दलं, घोडदळ, उंटदळ, इत्यादी सहभागी असतील. या संचलनात एकतेचा धागा या संकल्पनेवर आधारित महाराष्ट्राचा चित्ररथ सहभागी होणार आहे. या महोत्सवात येत्या ७ आणि ८ नोव्हेंबरला सांस्कृतिक कार्यक्रमातही महाराष्ट्राच्या लोकपरंपरा दाखवणारं १५ ते २० कलाकारांचं सादरीकरण असेल. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज पाटणा इथं वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. येत्या १ नोव्हेंबर पासून १५ नोव्हेंबर पर्यंत भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंती दिनी म्हणजेच जनजातीय गौरव दिनापर्यंत भारत पर्व साजरं केलं जाईल, अशी माहिती त्यांनी दिली.

महाराष्ट्रात उद्यापासून १५ नोव्हेंबरपर्यंत भारत पर्वानिमित्त विविध उपक्रम होणार असून त्यात युवकांनी भाग घ्यावा असं आवाहन राज्य शासनानं केलं आहे. यात पदयात्रा, निबंध, वादविवाद स्पर्धा, चर्चासत्र, पथनाट्य अशा विविध आविष्कारातून सरदार पटेल यांच्या जीवनकार्याची ओळख करुन दिली जाईल आणि या लोहपुरुषाला अभिवादन केलं जाईल.

**<><><>**

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत भारताचे पुढचे सरन्यायाधीश असतील. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांची सरन्यायाधीशपदी नियुक्ती केल्याबद्दल त्यांचं अभिनंदन करणारी पोस्ट केंद्रीय विधी आणि न्यायमंत्री अर्जून राम मेघवाल यांनी समाज माध्यमांवर केली आहे. त्यांची नियुक्ती २४ नोव्हेंबरपासून लागू राहील. सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांचा कार्यकाळ २३ नोव्हेंबरला संपेल. त्यांनंतर त्यांची जागा न्यायमूर्ती सूर्यकांत घेतील. ते देशाचे ५३ वे सरन्यायाधीश असतील.

**<><><>**

अर्थव्यवस्थेच्या भरभराटीसाठी एकात्मिक शेतीवर भर देणार असल्याचं केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी सांगितलं. एफ पी ओ म्हणजे कृषी उत्पादक संघटनांच्या नवी दिल्लीत आयोजित संमेलनात आज ते बोलत होते. शेतकऱ्यांनी केवळ शेती न करता उत्पादक बनावं असं आवाहन त्यांनी केलं.

**- - होल्ड- बाईट- कृषीमंत्री - -**

शेतकऱ्यांना उत्तम दर्जाचं बियाणं खात्रीने मिळावं याकरता केंद्रसरकार लौकरच बियाणे विषयक कायदा करणार आहे असं ते म्हणाले.

देशभरात आतापर्यंत सुमारे १० हजार कृषी उत्पादक संघटना स्थापन झाल्या असून त्यांची उलाढाल १०० कोटीपर्यंत पोहोचली आहे. ५२ लाख शेतकरी या संघटनांशी जोडले गेले असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

डिजिटल इंडिया उपक्रमा अंतर्गत न्यायपालिका, कार्यकारी मंडळ आणि विधिमंडळाचं डिजिटायजेशन करण्यात येत आहे, असं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितलं. ते आज नवी दिल्लीत तिसऱ्या राष्ट्रीय ई विधान परिषदेला संबोधित करत होते. कार्यकारी मंडळ, विधिमंडळ आणि न्यायपालिके◌ने डिजिटल तंत्रज्ञानाचा स्वीकार केल्यामुळे त्यांची कार्यक्षमता वाढली आहे, असं रिजिजू म्हणाले. या परिषदेत विधिमंडळांचे सचिव, नोडल विभागाचे सचिव यांच्यासह शंभर प्रतिनिधी उपस्थित होते.

**<><><><>**

जहाज बांधणी आणि नौवहन क्षेत्रात भारताने पुन्हा एकदा वर्चस्व प्रस्थापित केलं असल्याचं प्रतिपादन केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्री मनसुख मांडवीय यांनी केलं आहे. ते आज मुंबईत भारत नौवहन सप्ताहानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. वास्को द गामा भारतात पोहोचण्यापूर्वी अनेक वर्षांपासून भारतीय व्यापारी समुद्रमार्गे जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचले होते असं ते म्हणाले. अमृतकाळात नौवहन क्षेत्रातल्या भारतीय पारंपरिक ज्ञानाचा उपयोग करुन घेतला पाहिजे असं आवाहन त्यांनी केलं.

**- - होल्ड - मांडवीय - बाईट -**

भारतीय नौवहन क्षेत्रातल्या अग्रणी महिला कॅप्टन जे सी आनंद यांचा मांडवीय यांनी सत्कार केला.

<><><><>

ग्रामसभा हा लोकशाहीचा आत्मा असून ग्रामपंचायत हा सरकारचा प्राथमिक घटक असल्याचं आदिवासी व्यवहार राज्यमंत्री दुर्गादास उईके यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत मॉडेल युवा ग्रामसभा उपक्रमाचा प्रारंभ करताना बोलत होते. यावेळी या उपक्रमाची प्रशिक्षण प्रणाली आणि संकेतस्थळाचं प्रकाश उईके यांच्या हस्ते करण्यात आलं.

<><><><>

आयसीसी महिला विश्वचषक स्पर्धेत आज नवी मुंबईत डॉ. डी. वाय. पाटील स्टेडियमवर सुरु असलेल्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात ऑस्ट्रेलियानं भारतापुढं विजयासाठी ३३९ धावांचं आव्हान ठेवलं आहे.

ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला, आणि सामन्यातला शेवटचा चेंडू बाकी असताना सर्व गडी गमावून ३३८ धावांवर त्यांचा डाव संपला. फीबी लिचफिल्डनं तडाखेबंद खेळी करत ११९ धावा केल्या. एडीज पेरिनं ७७ तर ॲशली गार्डनरनं ६३ धावांचं योगदान दिलं.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या १३ षटकात २ बाद ७४ धावा झाल्या होत्या.

<><><><>

माजी राज्यपाल रा. सु. गवई यांच्या स्मारकाचं लोकार्पण आज अमरावती इथं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते झालं. गवई यांनी विविध पदावर काम केलं, त्यांची संसदीय कारकीर्द उत्तुंग आहे. पक्षीय सीमा ओलांडून त्यांनी सर्वांसोबत संबंध ठेवले, त्यामुळे देशभरातील लोक त्यांच्याशी जोडले गेले असं मुख्यमंत्री म्हणाले.

या कार्यक्रमाला भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई, तसंच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवारही उपस्थित होते.

<><><><>

मुंबई महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकांची तयारी वेगात सुरू झाली असून राज्य निवडणूक आयोगानं आरक्षण निश्चिती आणि सोडत कार्यक्रमाचं सविस्तर वेळापत्रक

जाहीर केलं. त्यानुसार, निवडणुकीसाठी ११ नोव्हेंबर रोजी आरक्षण सोडत काढली जाईल. १४ नोव्हेंबर रोजी आरक्षणाचं प्रारूप जाहीर झाल्यावर नागरिकांना आपल्या हरकती - सूचना नोंदविण्याची संधी मिळेल. २० नोव्हेंबरपर्यंत या हरकती स्वीकारल्या जातील. त्यानंतर सर्व हरकतींचा विचार करून पालिका आयुक्त अंतिम निर्णय घेतील आणि आयोगाची मान्यता घेऊन अंतिम आरक्षण २८ नोव्हेंबर रोजी शासन राजपत्रात प्रसिद्ध होईल.

<><><><>

सरदार वल्लभभाई पटेल यांनी देशाला एकत्र आणण्यात महत्वाची भूमिका बजावली आणि शांततामय पद्धतीनं भारतात संस्थानांचं विलीनीकरण करण्यासाठी अथक परिश्रम घेतले, असं बिहारचे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांनी म्हटलं आहे. ते आज दिल्ली विधानसभेत ‘सरदार वल्लभभाई पटेल आणि भारताच्या एकात्मतेसाठी त्यांनी दिलेलं मोलाचं योगदान’ या विषयावरच्या परिसंवादाला संबोधित करत होते. सरदार पटेल यांनी देशाच्या समृद्ध विविधतेचा आदर करण्याबरोबरच देशवासीयांमध्ये एकतेची भावना रुजवण्याचं आणि प्रखर राष्ट्रीय ओळख निर्माण करण्याचं काम केलं, असं ते यावेळी म्हणाले.

//<><><><>//